# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (सकाळ)

जा.क्र. १२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०३/२०१८

**१) संशयावरुन इसमास विहीरीत फेकुन त्याचे कपडे व जुते जाळुन पुरावा नष्ट केल्याने गन्हा नोंद . :—**

दिनांक २६/०२/२०१८ ते ०३/०३/२०१८ चे २१.०५ पुर्वी यातील आरोपीने मृतक पैकु उर्फ कांताप्रसाद सदाशिव कालेकर वय ३६ वर्ष, रा. देवनारा यास एकटा गाठुन त्यास अनैतीक संबधाचे संशया वरुन थापड बुक्यांनी व लाथांनी जोर जोरात मारहान करुन अदमारा करुन बांधीत ठेवल्याचे व दुस—या दिवशी त्यास विहीरी जवळ नेऊन त्याचे कपडे काढुन विहीरीत फेकुन त्याचे कपडे व जुते जाळुन पुरावा नष्ट केल्याने मर्ग क्र. ०६/१८ क. १७४ जाफौ. चे सरतर्फे फिर्यादी पोउपनि. जाईले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३०२,२०१ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाईले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) मोटार सायकलची आमोरा समोर धडक लागुन इसम खाली पडुन अज्ञात ट्रक त्याचे डोक्यावरुन गेल्याने इसम जागीच मरण पावल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०७/०३/२०१८ चे ११.४५ यातील फिर्यादी व मृतक काशिराम बकाराम मेश्राम वय ३२ वर्ष, रा. माडगी टेकेपार हे दोघे मोटार सायकल क्र. एमएच ३६ वाय ६९६३ ने डब्बल सिट लाखनी कडुन साकोली कडे एनएच ६ रोडने जात असता मोहघाट जंगल शिवारातील तेली नाल्याजवळ यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही हयगयीने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला समोरुन धडक दिल्याने मोटार सायकल वरुन फिर्यादी व मृतक खाली पडले तेवढयात मोगेहुन येणाऱ्या अज्ञात आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक मृतकचे डोक्यावरुन नेल्याने मृतक हा गंभिर जखमी होवुन जागीच मरण पावला व अज्ञात आरोपी ट्रक चालक हा ट्रकसह पळुन गेल्याने फिर्यादी छत्रपाल वासुदेव गेडेकर वय २२ वर्ष, रा. माडगी टेकेपार यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १३४(अ)(ब)/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. रेवतकरे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत एक इसम गंभिर जखमी . :—**

दिंनाक ०६/०३/२०१८ चे १९.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी आनंद तुकडु बावणे वय ३३ वर्ष, रा. खरबी याचे वडील जखमी तुकडु लहाणु बावणे वय ६५ वर्ष, रा. खरबी हा त्याचे चहापाण्याचे दुकानातुन डांबरी रोड ओलांडुन घराकडे पायी जात असता भंडारा कडुन तुमसर कडे जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, हयगयीने चालवुन जखमीस धडक मारुन गंभिर जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३८ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**४) कार निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला धडक देवुन वाहन अनियंत्रीत झाल्याने पुलाचे कटरीला धडक दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिंनाक ०७/०३/२०१८ चे २०.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी यश विलास रायपुरकर वय १८ वर्ष, रा. गणेश वार्ड पवनी हा त्याचे मोटार सायकलने जात असता यातील आरोपी कार चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकला कट मारुन त्याचे वाहन अनियंत्रीत झाल्याने पुलाचे कटरीला सिंधपुरी वैनगंगा नदी पुलीया येथे धडक देवुन अपघात केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . —**

दिंनाक ०७/०३/२०१८ चे १६.३० ते १६.४५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही पेपर देण्याकरीता लाल बहादुर शास्त्री विद्यालय येथे फिर्यादीने मोटार सायकलवर सोडुन दिले व पेपर संपल्याचे वेळेवर तिला घेण्याकरीता गेले असता, ती दिसुन आली नाही परीक्षा केन्द्रावर विचारपुस केली असता १६.०० ते १६.४५ वाजता दरम्यान पेपर देवुन निघुन गेल्याचे सांगीतले तिला कोणीतरी अज्ञात ईसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे असे फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. थेरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) **औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक ०६/०३/२०१८ चे १४.४० वाजता दरम्यान यातील मृतक राजेश श्रीराम ऊईके वय ३० वर्ष, रा. घानोड याचे डोक्यात १५ दिवसा पासुन फरक पडल्याने पागल सारखा वागत होता व पत्नी सोबत घानोड वरुन चिखला येथे आला व बाहेर फिरण्यास जातो असे सांगुन निघुन गेला घटणा वेळी व ठिकाणी यातील मृतकचे तोंडातुन फेस निघत असल्याने त्यास औषधोपचारा करीता सु. बो. दवाखाना तुमसर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो.स्टे. तुमसर येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४ जाफौ. चे कागदपत्रा वरुन सरतर्फे फिर्यादी सफौ. मेश्राम यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. कुरुडकर पोलीस स्टेशन गोबरवाही करीत आहेत.

७) **आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक ०७/०३/२०१८ चे ११.४५ वा. ते १२.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर हा आमरोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोनी. गुरनुले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गुरनुले पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ०७/०३/२०१८ चे १२.२० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर हा आमरोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोनी. गुरनुले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गुरनुले पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

८) **आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक ०७/०३/२०१८ चे १५.१० वा. ते १६.२० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो हा आमरोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. धावळे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना.धावळे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ०७/०३/२०१८ चे १५.२० ते. १६.२० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो हा आमरोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. धावळे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. धावळे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

९) **आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०६/०३/२०१८ चे १७.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा मॅजीक वाहन हा आमरोडवर येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. मते यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुसावळे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

१०) **अवैध देशी/जुगार दारु अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ०७/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, सिहोरा व लाखांदुर येथे अवैध देशी दारु/ जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १९ लिटर हातभट्टी दारु किंमती १९००/–रु. ४ लिटर ३२० मिली लिटर देशी दारु किंमती १२४८/–रु. तसेच जुगारातुन किंमती ३२७ असा एकुण ३,४७५ /रु. चा माल जप्त करण्यात आला.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०७/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी किंमती ०७ तीन सिटर वाहनाकरीता १२ ईतर वाहनांवरती – १२२ केसेस करण्यात आले आहे.

08.3.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.